# पिकनिक २०१० वार्तापत्र

महाराष्ट्र मंडळ, पिट्स्बर्ग

<u>कार्यकारिणी समिती</u> (२००९-१०)

<u>अध्यक्ष</u>
डॉ. प्रियदर्शन मनोहर

<u>उपाध्यक्षा</u>
सौ. संगीता बोकील

<u>सचिव</u>
सौ. नीता शिंदे

<u>कोषाध्यक्षा</u>
डॉ. सौ. अंजली मेढेकर

<u>वार्तापत्र संपादक</u>
डॉ. अरुण जतकर

<u>जाल-संचालक</u>
श्री. राजेश दिवेकर

<u>कार्यकारी सभासद</u>
श्री. शंतनु भिडे
डॉ. सौ. माधुरी गोडसे
सौ. मोनिका जाधव
डॉ. सौ. अमिता मुल्हेरकर
श्री. तेजस पेवेकर
श्री. अक्षय राजहंस

नमस्कार मंडळी!

संक्रांतीच्या कार्यक्रमानंतर पुन्हा आपली वार्तापत्राद्वारे भेट घेताना आम्हाला आनंद होतो आहे. मध्यंतरीच्या काळात पिट्स्बर्ग महाराष्ट्र मंडळाने पाच कार्यक्रम यशस्वीपणे सादर केले अथवा उत्साही सहभाग घेतला.

- श्री. श्रीधर फडके यांचा 'फिटे अंधाराचे जाळे' हा मराठी गीतांचा कार्यक्रम
- श्री. रवी गोडसे यांचा 'इफ इट एइंट ब्रोक, ब्रेक इट' हा इंग्रजी चित्रपट
- 'रंगसंगीत' हा सदाबहार कार्यक्रम
- मंडळाची वार्षिक सहल, आणि
- भारतीय स्वातंत्र्यदिन १५ ऑगस्ट.

वरील प्रत्येक कार्यक्रमाची तपशीलवार माहिती पुढे दिली आहेच. आता आगामी कार्यक्रम पुढीलप्रमाणे.

- श्रीगणेश चतुर्थी - रविवार १२ सप्टेंबर, हिंदू-जैन मंदिर
  - सकाळी १० वा. - महापूजा व प्रसाद
  - दुपारी २ वा. - स्वामी मुकुंदानंदांचे आध्यात्मिक भाषण
- कोजागिरी पौर्णिमा - ब्लू बेरी हिल पार्क ॲक्टिव्हिटी सेंटर,
  शुक्रवार २२ ऑक्टोबर सायंकाळी ७:३० वा.
- दिवाळी - शनिवार, १३ नोव्हेंबर. स्थळ-काळ ठरायचा आहे.

या कार्यक्रमांची माहिती महाराष्ट्र मंडळाच्या संकेतस्थळावर (www.mmpgh.org) उपलब्ध आहे.

यंदा मंडळाची पंचविसावी, रौप्यमहोत्सवी दिवाळी आहे! या संदर्भात महाराष्ट्र मंडळाच्या प्रगतीची माहिती देणारी स्मरणिका 'वाटचाल' प्रसिद्ध करण्याचे योजिले आहे. या स्मरणिकेसाठी सर्व माजी अध्यक्षांना व जुन्या सभासदांना नम्र विनंती की त्यांनी त्यांच्याकडच्या महाराष्ट्र मंडळासंदर्भातल्या रम्य आठवणी, छायाचित्रे उपलब्ध करून द्यावीत. ही माहिती कृपया श्री. सुधीर मनोहर (pmanohar63@hotmail.com) अथवा सौ. नीता शिंदे (neetashinde128@gmail.com) यांच्याकडे पाठवावी म्हणजे स्मरणिकेत त्यांचा समावेश करता येईल. ज्यांनी ही माहिती पाठवली आहे त्यांचे आभार!

याचप्रमाणे नव्या नामनिर्देशिकेची प्रसिद्धी करण्याचे कार्य हाती घेतले आहे. सध्याच्या नामनिर्देशिकेतील तुमचा तपशील (पत्ता, फोन नंबर, मुलांची व तुमची नावे इ.) अचूक आहे ना याची लवकर खात्री करून घ्या. काही बदल करायचा असल्यास तो सौ. नीता शिंदे यांना कळवावा. नीलपत्रधारी सभासदांची संख्या वाढवण्याचे काम कसोशीने चालू आहे. कृपया प्रत्येक सभासदाने त्यांच्या परिचयाच्या परंतु मंडळाचे सभासद नसलेल्यांना सभासदत्व घेण्यास प्रवृत्त करावे ही नम्र विनंती. शंभरी गाठण्याचे आपले अनेक वर्षांचे स्वप्न साकार होवो ही सदिच्छा!

धन्यवाद!

## -- श्रीधर फडके यांच्या कार्यक्रमाचा आढावा --

"बाबूजींचं गाणं ऐकणं जसं मनोहारी असतं तसंच बघणंही फार मनोहारी असायचं. ते गात असताना सगळं गाणं त्यांच्या चेहऱ्यावर दिसत असे. गाण्यात अभिनय कसा करायचा याला महत्व आहे. नुसतं गाणं म्हणून चालत नाही. गाण्याचा भाव, त्यातले शब्द, शब्दोच्चार, स्वर, लय, आणि त्याचबरोबर अभिनय जर आला तरच ते गाणं शंभर टक्के यशस्वी होतं..." श्रीधर फडके त्यांच्या शांत स्वरात यशस्वी भावगीतांचं रहस्य श्रोत्यांना उलगडून सांगत होते. रविवार दि. २१ मार्च रोजी पिट्स्बर्ग महाराष्ट्र मंडळाने गुढीपाडव्यानिमित्त आयोजित केलेल्या श्रीधर फडके यांच्या 'फिटे अंधाराचे जाळे' या सुमधुर भावगीतांच्या मैफिलीत गीतांच्या कथा, कवी/संगीतकार/गायकांचे किस्से, त्यांच्या आठवणी यांची पेरणी करत ते रंग भरीत होते. श्रीधरजींचा गोड आवाज, त्यांचं सुरेल पेटीवादन, श्री. प्रसाद जोशी (न्यू जर्सीचे शाहरूख खान) यांचा तबला आणि श्री. मयूर देवल यांचे सुयोग्य निवेदन यांमुळे तीन तासांची मैफिल चुटकीसरशी संपल्याचा भास झाला. 'सत्य-शिवाहून सुंदर हे!' या अजरामर गाण्याने सुरूवात करून 'सखी मंद झाल्या तारका', 'धुंद येथ मी स्वैर झोकतो', 'धुंदी कळयांना धुंदी फुलांना', 'तोच चंद्रमा नभात', अशी बहारदार गाणी सादर करत नामदेवांच्या 'येई हो विठ्ठले' या अभंगाने कार्यक्रमाची सांगता झाली. श्रीधरजींना सौ. विनीता बेळंबे व सौ. अंजली मेढेकर या स्थानिक गायिकांनी सुरेल साथसंगत केली ही अभिमानची गोष्ट! विनीताने गायलेलं 'धुंदी कळयांना' हे युगुल गीत व अंजलीने गायलेलं 'ज्योती कलश छलके' हे गाणं श्रोत्यांच्या पसंतीला उतरलं.

या कार्यक्रमासाठी श्री. दिलीप व सौ. नीमा कार आणि श्री. निरंजन व सौ. सुधा दीक्षित यांनी भरघोस आर्थिक मदत केली त्याबद्दल त्यांचे मनापासून धन्यवाद! श्री. गिरीश गोडबोले यांनी पेटी तर श्री. आदित्य नेमळेकर यांनी इलेक्ट्रॉनिक तानपुरा यांची सोय केली त्याबद्दल त्यांचे आभार! अभिजीत जोशी, शैलेश बोकील, हर्षल मुल्हेरकर, अनघा मनोहर, आणि मनाली साने या स्वयंसेवकांच्या मदतीने कार्यक्रम सुरळीत पार पडला. या सर्व स्वयंसेवकांचे आभार! मनोहर व भिडे कुटुंबीयांनी पाहुण्यांच्या राहण्याची सोय केली त्याबद्दल त्यांचे आभार!

या वेळी नीलम ऑडियो-वीडियो तसेच देसाई बंधू आंबेवाले यांचे स्टॉल्स उपलब्ध होते. चि. रिया मुल्हेरकर हिने लहान मुलांसाठी टी-शर्ट पेंटिंग ची सुविधा उपलब्ध करून महाराष्ट्र मंडळासाठी काही निधी निर्माण करून दिला. रियाचे कौतुक करावे तेवढे थोडेच! आगामी कार्यक्रमातही पिट्स्बर्गची युवा पिढी असाच सक्रिय सहभाग घेईल अशी आशा आहे.

सुमारे दोनशेहून अधिक सभासद तल्लीन होऊन कर्णमधुर संगीताचा आस्वाद घेत असताना असं वाटून गेलं की पिट्स्बर्ग च्या

*तिन्ही नद्यांच्या पात्रांमधुनी स्वरगंगा घेते वळसे...*
*ॲलिगेनीच्या शिखारांवरती काव्यसुरांचा प्रकाश उजळे... फेडुनी अंधाराचे जाळे!*

## -- श्री. रवींद्र गोडसे यांच्या चित्रपटाचा आढावा --

महाराष्ट्र मंडळाचे सभासद श्री. रवींद्र गोडसे यांचा तिसरा चित्रपट "इफ इट एइंट ब्रोक, ब्रेक इट" पिट्स्बर्ग मधील रीजन्ट स्क्वेअर चित्रपटगृहात दाखवण्यात आला. श्री. गोडसे यांचे पहिले दोन चित्रपट "डॉ. रवी अँड मि. हाईड" आणि "आय ॲम स्किझोफ्रेनिक अँड सो ॲम आय" असे आहेत. ह्या तिसऱ्या चित्रपटाची मध्यवर्ती कल्पना अशी आहे की एका व्यक्तीला (डॉ. रवी) असाध्य रोग झाल्याचं निदान सांगण्यात येतं आणि त्याला फक्त सहा महिने आयुष्य जगता येईल अशी सूचना डॉक्टर देतात. त्या सहा महिन्यांच्या अवधीत डॉ. रवी (चित्रपटाचा नायक) त्याच्या मैत्रीतल्या सहा माणसांचं आयुष्य सुधारून द्यायच्या खटपटीला लागतो. ह्या अनाहूत उद्योगातून निर्माण होणाऱ्या विनोदी प्रसंगांच्या मालिकेतून चित्रपटाची कथा उलगडत जाते. श्री. गोडसे यांचा नर्मविनोद आणि उत्कंठापूर्ण कथा यांमुळे प्रेक्षक खुर्चीला खिळून राहतो. श्री. गोडसे यांचे पिट्स्बर्ग महाराष्ट्र मंडळा तर्फे अभिनंदन व पुढील चित्रपटासाठी शुभेच्छा!

महाराष्ट्र मंडळाने दि. २६, २७, २८ मार्च रोजी दाखवल्या जाणाऱ्या काही खेळांची तिकिटे सभासदांसाठी आरक्षित केली होती. महाराष्ट्र मंडळाच्या सुमारे ७० सभासदांनी या चित्रपटाचा आनंद लुटला. या कार्यक्रमाला लाभलेल्या प्रायोजकांचे - श्री. गिरीश ठकार व "अनामिक" यांचे हार्दिक आभार!

# -- रंगसंगीत कार्यक्रमाचा आढावा --

पिट्स्बर्ग महाराष्ट्र मंडळाचा लोकप्रिय कार्यक्रम 'रंगसंगीत' शनिवार दि. १५ मे रोजी श्री वेंकटेश्वर मंदिराच्या सभागृहात सुमारे दोनशे सभासदांच्या उपस्थितीत यशस्वीपणे पार पडला. सलग पाचव्या वर्षी सादर झालेल्या या कार्यक्रमात प्रथम श्री. प्रियदर्शन मनोहर लिखित 'संसार...व्हर्जन टू' ही धमाल विनोदी एकांकिका तर मध्यंतरानंतर 'ग्लोबल कल्चर्स थ्रू डान्सेस' हा यूथ फोरम (युवामंच), म्हणजेच तरुण मुलामुलींनी बसवलेला नृत्यांचा अनोखा कार्यक्रम! समारंभाला प्रमुख पाहुण्या म्हणून बृहन महाराष्ट्र मंडळाच्या अध्यक्षा सौ. माधुरी जोशी लाभल्या होत्या.

गेल्या पाच वर्षांत 'रंगसंगीत' कार्यक्रमात अनेक दर्जेदार एकांकिका आणि संगीताच्या मैफिली अंतर्भूत झाल्या आहेत. २००६ सालच्या पहिल्या कार्यक्रमात 'विठ्ठल तो आला आला' ही पु. लं. ची एकांकिका आणि पिट्स्बर्ग च्या कलाकारांचा सुगम संगीताचा कार्यक्रम सादर झाला. दुसऱ्या वर्षी म्हणजे २००७ साली योगेश सोमण लिखित दोन एकांकिका 'गप्पा' आणि 'इन्वॉल्व्मेंट फॅंटेसी' निर्मिल्या गेल्या व मध्यंतरात न्यू यॉर्क च्या बहुगुणी टोपे कुटुंबीयांनी काही गाणी सादर केली. तिसऱ्या वर्षी (२००८) श्री. प्रियदर्शन मनोहर लिखित दोन एकांकिका 'सुट्टीचा दिवस' आणि 'व्हर्च्युअल रिॲलिटी' बसविल्या गेल्या. गेल्या वर्षी (२००९) श्री. मनोहर लिखित 'आनंदी आनंद गडे' या एकांकिकेबरोबरच टोरोंटो चे सुप्रसिद्ध पिता-पुत्र श्री. नरेंद्र व चि. रवी दातार यांचा 'स्वरगंध' हा गाण्याचा कार्यक्रम अतिशय लोकप्रिय ठरला. या सर्व एककिकांचे प्रयोग इतर ठिकाणी सुद्धा - उदा. क्लीव्हलॅंड, कोलंबस, न्यू यॉर्क, डेलावेअर, मेरीलॅंड इ. ठिकाणी - झालेले आहेत.

यंदाच्या रंगसंगीत कार्यक्रमात काही वैशिष्ट्यपूर्ण गोष्टी होत्या. पहिली म्हणजे ही निर्मिती भव्य होती. नाटकामध्ये अकरा कुटुंबातली मिळून वीस माणसं तर युवामंच मध्ये बावीस तरुण कलाकारांसह एकूण पंधरा कुटुंबांतल्या बत्तीस माणसांचा सहभाग होता! दुसरं म्हणजे एकांकिकेमध्ये संगीत व नृत्य दोन्ही होतं! तिसरं म्हणजे हे संगीत व पार्श्वगायन पिट्स्बर्ग च्या कलाकारांनीच निर्माण केलेलं होतं. आणि चौथं म्हणजे 'युवामंच' ची कल्पना! सर्वसाधारणपणे मराठी मंडळाच्या कार्यक्रमांत असा अनुभव येतो की मोठे लोक कार्यक्रम बघत असताना युवा पिढी मात्र कंटाळून सभागृहच्या बाहेर खेळात बसते. या मुलांना मराठी मंडळाच्या कार्यक्रमांत रस वाटावा, त्यांचा उत्साही सहभाग त्यात असावा, या हेतूने 'युवामंच' ह्या अभिनव उपक्रमाची आखणी अध्यक्ष श्री. सुधीर मनोहर यांनी केली व उपाध्यक्षा सौ. संगीता बोकील यांनी ती तडीस नेली!

वय वर्षे १३ ते १८ या वयोगटातल्या मुला-मुलींना असं आवाहन केलं की त्यांनी एका तासाच्या एका उत्कृष्ट कार्यक्रमाची निर्मिती करावी. जगभरच्या वेगवेगळ्या संस्कृतींचं दर्शन त्यांनी नृत्यांच्या माध्यमातून लोकांना घडवावं. आणि चमत्कार व्हावा तसं हे आव्हान बावीस तरुण पोरांनी स्वीकारलं आणि त्यांना त्यांच्या कुटुंबीयांनी आणि महाराष्ट्र मंडळाच्या कार्यकारी समितीने सबळ पाठिंबा दिला. वेगवेगळी नऊ नृत्यं मुलांनी बसवली - भरतनाट्यम शैलीतल्या गणेश स्तवनाने सुरूवात करून कोरियन समशेर नृत्य, आफ्रिकन सफारी, क्युबन साल्सा, आयरिश, अरेबिक, अमेरिकन हिप-हॉप, पंजाबी भांगडा, आणि सर्वात शेवटी 'वन वर्ल्ड' हे नृत्य सादर करून जगभरच्या संस्कृतींची ओळख आणि वैविध्य त्यांनी प्रेक्षकांसमोर जिवंत केलं. प्रेक्षकांनी धरलेल्या पायाच्या ठेक्यात, टाळयांच्या गजरात, शिट्ट्यांच्या उत्साहात, 'वन्स मोअर' ची मागणी केली गेली आणि युवा कलाकारांनी ती तात्काळ पुरविली! संस्कृतींचा आणि नृत्यशैलींचा अभ्यास, कार्यक्रमाची बांधणी, सादरीकरण, सूत्रसंचालन, इ. सर्व बाबी मुलांनी समर्थपणे सांभाळल्या. कार्यक्रमाच्या आणि नृत्यांच्या निर्मितीप्रक्रियेत कोणतीही ढवळाढवळ न करता मुलांना त्यांचे निर्णय घेण्याचं स्वातंत्र्य दिलं गेलं ही त्यातली आनंदाची बाब!

एकांकिकेचं कथासूत्र प्रेक्षकांना भावलं कारण ती कथा घराघरांत घडणारी आहे! बायको, आई आणि नोकरी/व्यवसाय करून पैसे मिळवणारी स्त्री ह्या भूमिका यशस्वीपणे सांभाळणं म्हणजे तारेवरची कसरतच! जगाच्या पाठीवर तुम्ही कुठेही राहत असा - रोजरोजची न संपणारी ही कसरत करून थकल्या भागलेल्या जीवांना असं वाटणारच - 'देवा, कृपा कर! मला माझं आयुष्य सुधारून दे! मला संसाराची व्हर्जन टू दे!'. आणि खरंच! देव तुमच्या मदतीला धावला तर? या कल्पनेवर आधारित एकांकिका 'संसार...व्हर्जन टू' पिट्स्बर्ग च्या कलाकारांनी सफाईदारपणे सादर केली. नेपथ्यकार श्री. रत्नाकर मुजुमदार यांनी दिवाणखाना, अमेरिकन पडवी आणि देऊळ असे तीन देखावे नेटकेपणाने उभे केले. श्री. संदीप सबनीस व सौ. अनघा मनोहर यांचं समर्थ दिग्दर्शन, तर हर्षल व सौ. अमिता मुल्हेरकर यांचं पार्श्वसंगीत यांनी नाटकात विशेष रंग भरला.

एवढ्या मोठ्या निर्मितीच्या यशापाठी अनेक हात अनेक आठवडे झटत होते. विशेषत: मंडळाच्या कार्यकारिणी समितीचे अनेक सभासद व त्यांचे कुटुंबीय यांचे विशेष आभार! या व्यतिरिक्त सौ. निवेदिता बदामी आणि श्री. दिलीप बाळसराफ यांचे आभार. या कार्यक्रमाला पुरस्कृत केल्याबद्दल खालील व्यक्तींचे आभार.

- श्री. प्रियदर्शन व सौ. अनघा मनोहर
- श्री. शैलेश व सौ. संगीता बोकील
- श्री. नितीन व सौ. नीता शिंदे
- श्री. हर्षल व सौ. अमिता मुल्हेरकर
- चि. रिया मुल्हेरकर

सौ. अमिता मुल्हेरकरांनी घरी शिवलेले नृत्याचे कॉस्च्यूम्स केवळ अप्रतिम होते! अमिताचे खास आभार!

मध्यंतरातील बटाटेवड्यांची चव आठवत, नाट्यरंग जागृत ठेवत आणि तरुण मराठी-अमेरिकन पिढीच्या यशाची खात्री बाळगत पिट्स्बर्ग महाराष्ट्र मंडळाचे सभासद घरी परतले ते पुन्हा असा कार्यक्रम केलाच पाहिजे असा आग्रह धरूनच!

## -- सहलीचा आढावा --

शनिवार दि. १२ जून रोजी महाराष्ट्र मंडळाची वार्षिक सहल एल्म ग्रोव पार्क येथे आनंदाच्या व उत्साहाच्या वातावरणात पार पडली. सहलीसाठी हवामानही आल्हाददायक लाभलं होतं.

तंदुरी चिकन, कणसे, चिप्स-डिप, इ. स्टार्टर्स नंतर दाल फ्राय, चिकन टिक्का मसाला, मलई कोफ्ता, व्हेज कूर्मा, नान, राइस, रायता व गुलाबजाम अशा सुग्रास व चमचमीत भोजनाची व्यवस्था होती. वॉलीबॉल, फुटबॉल अशा मोठ्यांच्या खेळांबरोबरच वॉटर बलून्स, रिंग्स अशा लहानांच्या खेळांत मोठेही सहभागी झाले! खेळ आणि गप्पाटप्पांनंतर सुमधुर कलिंगडांचा आस्वाद घेऊन सहलीची सांगता झाली. सुमारे १९० सभासदांनी सहलीचा आस्वाद घेतला. सहलीचा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी खालील सभासदांनी विशेष मदत केली, त्यांचे हार्दिक आभार!

- प्रसाद मनोहर
- हर्षल मुल्हेरकर
- नितीन शिंदे
- शैलेश बोकील
- मनीष जाधव
- मानसी जाधव
- राजीव गोडसे

## -- स्वातंत्र्यदिनाचा आढावा --

'भारत माता की जय', 'जय हिंद', 'वन्दे मातरम्' च्या जोशपूर्ण घोषणांनी पिट्स्बर्ग विद्यापिठाचा परिसर दुमदुमला होता. 'इंडियन नॅशनॅलिटी रूम' ने आयोजित केलेल्या स्वातंत्र्यदिनाच्या सोहळयात महाराष्ट्र मंडळाबरोबरच गुजराती समाज, हिंदू-जैन मंदिर, वेंकटेश्वर मंदिर, चिन्मय मिशन, यांसारख्या अनेक संस्थांनी उत्साहाने भाग घेतला आणि प्रत्येकाच्या हृदयात वाहणारी भारतीयत्वाची गंगा एकच आहे याची प्रचीती आणून दिली. मनोहर, दिवेकर, बोकील, जाधव, मेढेकर, हत्तंगडी, हेगडे, केळकर, केंकरे, मोघे, करवंदे, शुभाताई जोशी व त्यांच्या कन्या जुई व सायली, पेवेकर, देसाई, नागपाल, फुले, अशा अनेक मराठी कुटुंबांनी व पिट्स्बर्ग विद्यापिठातील मराठी विद्यार्थ्यांनी पंधरा ऑगस्टच्या संचलनात व त्यानंतरच्या सांस्कृतिक कार्यक्रमात भाग घेतला होता. जागतिक कीर्तीचे संख्याशास्त्रज्ञ प्रा. सी. आर. राव या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे होते.

वरील सर्व कार्यक्रमांना सभासदांची उपस्थिती विक्रमी होती ही विशेष आनंदाची बाब! असाच भरघोस प्रतिसाद आपण आगामी कार्यक्रमांना द्याल अशी आशा व विनंती.

## -- हार्दिक अभिनंदन --

- श्री. गिरीश व सौ. दीपा गोडबोले यांची ज्येष्ठ कन्या चि. पूजा गोडबोले कार्नेगी मेलन विद्यापिठातून व्यवसाय व्यवस्थापन (business administration) मध्ये पदवी प्राप्त करून मकेनझी कंपनीत नोकरीवर रुजू होत आहे. दोन वर्षांचा अनुभव घेऊन ती हार्वर्ड बिझनेस स्कूल मध्ये उच्च शिक्षणासाठी दाखल होणार आहे. चि. पूजाचे हार्दिक अभिनंदन व शुभेच्छा.
- श्री. प्रियदर्शन व सौ. अनघा मनोहर यांचा ज्येष्ठ पुत्र चि. तन्मय मनोहर जॉन्स हॉपकिन्स विद्यापिठातून बायोमेडिकल इंजिनियरिंग व गणित आणि संख्याशास्त्र या विषयांत पदवी प्राप्त करून ॲक्सेंचर कंपनीत नोकरीसाठी रुजू झाला. दोन वर्षांच्या कार्यानुभवानंतर त्याची मॅनेजमेंट मध्ये उच्च शिक्षण घेण्याची इच्छा आहे. चि. तन्मयचे हार्दिक अभिनंदन व शुभेच्छा.
- मंडळाचे दीर्घकालीन सभासद श्री. दीपक व सौ. निर्मल कोतवाल आजोबा-आजी झाले! त्यांची कन्या सौ. रूपाली व जावई श्री. सौमिल दोशी यांना पुत्ररत्न झाले. बाळाचे नाव अर्जुन ठेवण्यात आले आहे. सर्वांचे अभिनंदन व बाळास अनेक आशीर्वाद.
- मंडळाचे अध्यक्ष श्री. प्रियदर्शन उर्फ सुधीर मनोहर यांचे दुसरे पुस्तक - विनोदी लेखांचा संग्रह "आनंदाचा फॉर्म्युला" अजब पुस्तकालय, कोल्हापूर यांनी प्रसिद्ध केला. श्री. मनोहरांचे अभिनंदन व पुढील लेखनासाठी सदिच्छा.
- सौ. अस्मिता रंगनाथन यांचे रामायणावरचे गद्य-पद्य पुस्तक www.jainpub.com येथे उपलब्ध आहे. हे पुस्तक www.amazon.com आणि www.barnesandnoble.com या संकेतस्थळांवर खरेदीसाठी उपलब्ध आहे. सौ. रंगनाथन यांचे अभिनंदन व पुढील लेखनासाठी शुभेच्छा!
- पिट्स्बर्ग महाराष्ट्र मंडळाच्या नवीन सभासद सौ. अनुराधा केळकर यांचे कथ्थक नृत्याचे क्लासेस ग्रीन ट्री, माउंट लेबनॉन व डॉर्मेंट अशा तीन ठिकाणी सुरू झाले आहेत. अधिक माहितीसाठी सौ. केळकर यांच्याशी संपर्क साधावा - भ्रमणध्वनी: ७१७-३०७-५६५३ किंवा ईमेल: ask7x12@yahoo.com .
- मंडळाचे दीर्घकालीन सभासद श्री. निरंजन दीक्षित यांचा ७० वा वाढदिवस अलिकडेच साजरा झाला. महाराष्ट्र मंडळाकडून त्यांना शुभेच्छा! जीवेत शरद: शतम्!

## -- हायस्कूल ग्रॅंजुएशन --

- श्री. प्रशांत व सौ. अमिता अंबे यांची ज्येष्ठ कन्या चि. त्रिशा अंबे पीटर्स टाउनशिप येथील हायस्कूलमधून उत्तम गुणांनी उत्तीर्ण होऊन कार्नेगी मेलन विद्यापिठात पदवीसाठी प्रवेश घेत आहे. त्रिशाचे हार्दिक अभिनंदन व पुढील शिक्षणासाठी शुभेच्छा!

## -- दु:खद घटना --

- मंडळाचे सभासद डॉ. संजय लांबोर यांचे वडील श्री. प्रभाकर लांबोर यांना पुणे येथे देवाज्ञा झाली. ईश्वर मृतात्म्यास चिरशांती देवो.
- मंडळाच्या कार्यकारिणीचे सभासद श्री. राजेश दिवेकर यांचे वडील श्री. राघवेंद्र दिवेकर यांचे मुंबई येथे देहावसान झाले. ईश्वर मृतात्म्यास चिरशांती देवो.

महाराष्ट्र मंडळाचे सभासद लांबोर व दिवेकर कुटुंबियांच्या दु:खात सहभागी आहेत.

## -- सूचना --

- मंडळाच्या दीर्घकालीन सभासद श्रीमती शुभा जोशी यांची शिकागोवासी कन्या सौ. सायली जोशी यांची बृहन महाराष्ट्र मंडळाच्या शिकागो अधिवेशनाच्या सुकाणू समितीमध्ये (steering committee) निवड झाली आहे. हे अधिवेशन जुलै २१-२४ २०११ या दरम्यान भरणार आहे. अधिक माहितीसाठी http://bmm2011chicago.org या संकेतस्थळाला भेट द्यावी किंवा सायलीशी (saily.joshi@bmm2011.chicago.com) संपर्क साधावा. सायलीला पुढील कार्यासाठी शुभेच्छा.

## -- सर्व सभासदांना जाहीर आवाहन --

- गणेशपूजेसाठी मंदिरात उपस्थित असलेल्या सर्व भक्तांना मंडळ महाप्रसाद म्हणून भोजन देते व त्यासाठी शुल्क आकारले जात नाही. तसेच नवीन कायद्यांनुसार मंडळाला एक खास विमा (liability insurance) उतरवणे आवश्यक झाले आहे.
- या सर्व गोष्टींचा खर्च नीलपत्रधारी सभासदांनी भरलेल्या वार्षिक वर्गणीतून निभावून न्यावा लागतो. म्हणून सर्वांना नम्र विनंती की जास्तीत जास्त मंडळींनी नीलपत्रधारी सभासद व्हावे. तसे घडून आल्यास विविध कार्यक्रमांच्या वेळी पुरस्कर्ते वा देणग्या गोळा करण्याची आवश्यकता कमी होईल व अधिकाधिक कार्यक्रमांचे आयोजन करण्याचे आर्थिक पाठबळ मंडळाला लाभेल.
- मंडळाची सर्व वार्तापत्रे, आगामी कार्यक्रम, आधीच्या कार्यक्रमांचे फोटो इ. माहिती मंडळाची वेबसाईट (www.mmpgh.org) येथे उपलब्ध असते याची नोंद घ्यावी. तसेच आपल्या परिसरात व कामाच्या ठिकाणी कोणी नवीन कुटुंब/व्यक्ती आल्यास त्यांनाही मंडळाची व वेबसाईटची माहिती द्यावी.
- आजच्या घटकेला मंडळाचे सुमारे नव्वद (९०) नीलपत्रधारी सभासद आहेत.
- मंडळाची स्मरणिका/नामनिर्देशिका व गणेश पूजा यांसाठी देणगी देण्याचे आवाहन करीत आहोत. आपल्या सहकार्याबद्दल मन:पूर्वक आभार!

कार्यकारी समिती २००९-१०, महाराष्ट्र मंडळ पिट्स्बर्ग